आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार
**निशाणी क्र. ५५/ क –लगत**

**दिनांक ०५.०६.२०२५ रोजी–**

**<u>अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची पुढील जबानी शपथेवर सुरू–</u>**
**<u>अभियोग पक्षा करीता विद्वान सौ. राऊत एम.एस., सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –</u>**

८. मी आमचे विभागीय क्रिडा समीतीचे सचीव यांनी बँकेला दिलेले पत्र ओळखेल. मला आमचे तत्कालीन सचीव श्री. अशोक गीरी यांनी दिलेले ०७/०३/२०१९ रोजीचे अलाहाबाद बँकेला दिलेले पत्र दाखवले ते हेच पत्र आहे यावरती तत्कालीन श्री. अशोक गिरी तत्कालीन जिल्हा क्रिडा अधिकारी तथा सचिव यांची सही आहे. यात लिहीलेला मजकुर खरा व बरोबर असुन यावरची सही मी ओळखतो. यावरील सही मी ओळखतो याचे कारण त्यांच्या उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरील सह्या नुसार ओळखतो. हे पत्र आमच्या कार्यालयामार्फत नमुना स्वाक्षरी साठी दिलेले होते. या पत्राला **<u>निशाणी क्रमांक ६१</u>** देण्यात येते. या पत्रासोबत सचिवांनी बँकेला दिलेले नमुना स्वाक्षरी तसेच पदमुक्त अधिकारी श्री. महादावाद यांच्या सहीचा कागद बँकेला दिलेला होता तो मला दाखवला. तो हाच आहे. हा कागद बँकेला मीळाला म्हणुन त्यावर बँकेचा शिक्का व स्वाक्षरी आहे. यामध्ये नमुना स्वाक्षरी म्हणुन अशोक गिरी यांची सही आहे. या निशान पत्रासोबत अशोक गिरी यांचे आधार कार्ड व पॅन कार्ड ही दिलेले आहे. या नमुना स्वाक्षरीच्या पत्राला **<u>निशाणी क्रमांक ६१–अ</u>** देण्यात आला. अशोक गिरी यांच्या आधार कार्डला **<u>निशाणी क्र.६१–ब</u>** व पॅन कार्डला **<u>निशाणी क्र. ६१–क</u>** देण्यात आला.

९. तत्कालीन सचीव संजय सबनिस यांनी दि. २६/०९/२०२३ रोजी इंडीयन बँक शाखा जालना रोड यांना दिलेले सही नमुन्याचे पत्र मला दाखवले. हे पत्र या पत्रासोबत नमुना स्वाक्षरी सुद्धा श्री. संजय सबनीस यांनी पाठवले ते पत्र हेच आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. श्री. संजय सबनीस यांच्या सोबत मी काम केले असल्यामुळे त्यांची सही ओळखतो यावर त्यांचीच सही आहे व सही नमुना सुद्धा त्यांचाच आहे. या पत्राला **<u>निशाणी क्रमांक ६२</u>** देण्यात आले. वेब मल्टी सर्वीसेस यांनी आमच्याकडे नियुक्त केलेल्या माहे जानेवारी–२०२४ मधील एकुण कार्यरत कंत्राटी कर्मचार्यांची यादी मला दाखवल्यास मी ओळखेल. मला दाखवली ती हीच यादी आहे. या यादीत यशोदा शेट्टी, लेख लिपीक तसेच हर्ष कुमार क्षिरसागर संगणक ऑपरेटर म्हणुन नमुद आहे. ही यादी आमच्या कार्यालयानेच दिलेली असुन यावर आमच्या

कार्यालयाचा शिक्का असुन माजीच सही आहे. या यादीला **निशाणी क्रमांक ६३** देण्यात आले .

**१०**. आमच्या कार्यालयात हर्षकुमार याचे संगणक ऑपरेटर व लिपीक असे काम होते तर यशोदा शेट्टी यांचे लेखा लिपीक म्हणुन काम होते. यशोदा शेट्टी व हर्षकुमार यांचे काम आमच्या कडे विभागीय क्रिडा संकुल समीतीचा पत्रव्यवहार करणे, रोख रक्कम जमा करुन पावत्या फाडणे, जमा झालेली रक्कम बँकेत भरणे, बँकेकडुन स्टेटमेंट मागवने, कॅशबुक मध्ये नोंदी घेणे, बँकेशी इतर पत्रव्यवहार करणे, सर्व खर्चाच्या बाबींची नोंद घेणे इ. कामे होती.

**११**. इंडीयन बँक जालना रोड शाखेतील खाते हे शासनाकडुन जमा होणारा निधी व त्या निधीतुन क्रिडा संकुलात होणारे बांधकाम व क्रिडा सुविधा यासाठी होणारे खर्च हे करण्यासाठी होते. या इंडीयन बँक मधील व्यवहार हे तत्कालीन सदस्य सचिव संजय सबनीस सर यांच्या सहीने होत होते. संजय सबनीस हे ७ सप्टेंबर २०२३ पासुन आमच्या कडे नियुक्त झाले तेव्हापासुन हे खाते त्यांच्या सहीने चालते. मी पोलीसांना श्री. सबनीस यांचा नियुक्ती आदेश दिलेला आहे. मला हा नियुक्ती आदेश दाखवला. तो हाच आहे. यातील मजकुर खरा व बरोबर असुन यातील तत्कालीन आयुक्त क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य यांची सही आहे हा आदेश दि. ०४.०९.२०२३ रोजीचा आहे यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का असुन व माजी सही आहे. ही सही पोलीसांनी सांगीतल्याप्रमाणे कागदपत्र मागीतली त्यानुसार कागदपत्रे शिक्का व सही करुन दिले या आदेशााला **निशाणी क्रमांक ६४** देण्यात आले.

**१२**. आमच्या या इंडीयन बँकेच्या खात्याच्या अभिलेखाप्रमाणे विभागीय क्रिडा संकुलाच्या बांधकाम व सुविधा निर्मीतीकरीता आज अखेर ५९०७.६२ लाख रुपये जमा झाले होते. साक्षीदार सांगतो की आजपर्यंत म्हणजे तक्रार दाखल करेपर्यंत ही रक्कम जमा झाली. तक्रार दाखल होई तोपर्यंत रक्कम रुपये ३७७१.८२ लाख एवढी रक्कम क्रिडा संकुलाच्या बांधकाम व सुविधांसाठी खर्च झालेली आहे. दि. ३१.०३.२०२४ रोजी या बँकेच्या खात्यामध्ये रक्कम २२८९१०४७३/– रुपये शिल्लक होते. ही शिल्लक आमच्या बँकेच्या खाते उतारा मध्ये दिसुन येते मला खाते उतारा दाखवला यावर एवढ्या शिल्लकेची नोंद रक्कम रुपये २२८९१०४७३/– दिसते. हा खाते उतारा आमच्याच बँकेचा आहे. हा खाते उतारा संगणक प्रणालीद्वारे काढण्यात आलेला आहे परंतु आज हा संपुर्ण खाते उतारा संपरीक्षेत ओळखता यावा म्हणुन आता फक्त निशाणी देण्यात येते. योग्य शाबीत झाला किंवा नाही हे अंतीम युक्तीवादा नंतर ठरविण्यात येते.

या बँकेचा खाते उतारा दि. ०१.०१.२०२४ ते २४.१२.२०२४ यास **निशाणी क्रमांक ६५** देण्यात येते.

**१३.** हा खात्यातील निधी हॉकी ॲस्ट्रोटर व ४०० मीटर सिंन्थेटीक ट्रॅकसाठी ठेवण्यात आला होता. या सिंन्थेटीक ट्रॅकसाठी समीतीने महापोर्टल वर टेंडर प्रसीद्ध दि. ०४.०८.२०२३ रोजी प्रसिद्ध केले. या टेंडर प्रक्रीयेत मेसर्स सीनकॉर्ट एक्झीम यांनी मेसर्स स्पोर्टीना एक्झीटने दिलेल्या अनुभव प्रमाणपत्रवर हरकत घेतली. त्यांनी मा. उच्च न्यायालयात या हरकतीसंदर्भात याचीका दाखल केली याचा क्र. १७९/२०२४ असा होता. मा. न्यायालयाने या टेंडर प्रक्रीयेत आर्थीक दराचा लिफाफा उघडु नये असा आदेश केला. दि. ३०.०९.२०२४ रोजी मा. उच्च न्यायालयाने ही याचीका फेटाळली. पुढे ही निवीदा प्रक्रीया सुरु करण्यास परवानगी दिली.

**(मध्यांन्हाची वेळ झाल्याने पुढील सरतपास दुपार नंतरच्या कालावधी पर्यंत तहकुब.)**

समक्ष
–/स्वाक्षरीत/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.
–/स्वाक्षरीत/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

**दिनांक– ०५/०६/२०२५**

**दुपार नंतरच्या कालावधीनंतर– अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची पुढील जबानी शपथेवर सुरू**

**अभियोग पक्षा करीता विद्वान सौ. राऊत एम.एस., सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

**१३.** डिसेंबर २०२४ या महीन्यात आम्ही पुन्हा ही निवीदा प्रक्रीया सुरु केली.

**प्रश्न** – ३०.०९.२०२४ रोजी उच्च न्यायालयाचा निकाल झाला तरी सुद्ध निवीदा प्रक्रीया सुरु करण्यास एवढा कालावधी का लागला ?

**उत्तर** – दि. ३०.०९.२०२४ रोजी मा. उच्च न्यायालयाचा निकाल झाला परंतु या आदेशाची प्रत आम्हाला ७.१०.२०२४ रोजी मिळाली. परंतु त्या वेळेला उपसंचालक संजय सबनीस वैद्यकीय कारणास्तव रजेवर होते. ते जेव्हा रुजु झाले तेव्हा महाराष्ट्र विधानसभेच्या निवडनुकीची आचार संहीता लागु झाली. आचार संहीता संपल्यावर डिसेंबर महीन्यात आम्ही ही निवीदा प्रक्रीया सुरु केली.

**१४**. दरम्यानच्या काळात महालेखापाल, मुंबई यांच्या मार्फत विभागीय क्रिडा संकुल समीती चे लेखा परीक्षण केले. हे लेखा परीक्षण २६.०८.२०२४ ते १०.०९.२०२४ या कालावधीत झाले. हे लेखा परीक्षण सन २०१९ ते २०२४ या कालावधीचे झाले. या लेखा परीक्षणासाठी आरोपी क्र.१ हर्षकुमार याने बँकेच्या नावे एक पत्र बँक स्टेटमेंट पाहीजे म्हणुन तयार केले. हे पत्र् दि. ३०.०८.२०२४ रोजीचे होते. त्याचा जा.क्र. उ.प.स. /बँक/स्टे मी/२०२४–२०२५ असा होता. हे पत्र आरोपी हर्षकुमार याने बँकेत नेउन दिले. हे पत्र् देताना आरोपी क्र.१ हर्षकुमारने या पत्रावर स्वतःच्या हाताने लिहीला हा ई मेल आयडी dsccch.sambhajinagar@gmail.com असा होता व बँकेकडुन या ई मेल आयडीवर अकाउंट स्टेटमेंट मागवले. या पत्रावर सही संजय सबनीस यांची होती. हे पत्र मला दाखवल्यास मी ओळखेल मला ३०.०८.२०२४ रोजीच्या या पत्राची दोशारोपपत्रासोबत असलेली प्रत दाखवली. ती हीच आहे. बँकेकडुन आरोपी क्र.१ हर्षकुमार याने या दिलेल्या ई–मेल आयडीवर बँकेचा खाते उतारा मिळवला. मग त्या खाते उतारात अपहार केल्याच्या नोंदी होत्या त्या एडीट करुन काढुन टाकल्या व बँकेचा खाते उतारा बनउन लेखा परीक्षन समीतीला ते सादर केले. आरोपी क्र.१ ने लेखा परीक्षण समीतीला दिलेल्या खाते उता–यावरुन लेखा परीक्षण झाले. निवीदा प्रक्रीया सुरु करण्यासाठी श्री.संजय सबनीस यांनी स्टेटमेंट मिळने करीता दिनांक १२.१२.२०२४ रोजी कळवले होते. बँकेकडुन स्टेटमेंट न मिळाल्याने कार्यालयातील वरीष्ठ लिपीक स्वप्नील तांगडे याने बँकेशी संपर्क केला. त्यावेळेला बँकेने सांगीतले की, dsccch.sambhajinagar@gmail.com या ईमेल आय डी वर स्टेटमेंट पाठविले. मग आमच्या कार्यालयाने बँकेला कळवीले की हा आमच्या कार्यालयाचा अधिकृत ई–मेल नाही तर आमच्या कार्यालयाचा अधीकृत ई–मेल हा dydsportsabad@gmail.com असा आहे व या ई–मेल आयडीवर स्टेटमेंट पाठविण्यासाठी कळविले. १३.१२.२०२४ रोजी बँकेकडुन खाते उतारा आमच्या अधीकृत ई–मेल dydsportsabad@gmail.com वर प्राप्त झाले. हे स्टेटमेंट पाहीले असता असे लक्षात आले की बँकेत शिल्लक ही १३६९७१४५/– रुपये होती. ही नोंद <u>निशाणी क्र ६५</u> बँकेचा खाते उतारा याच्या त्यादिवशीच्या नोंदीत ही रक्कम दिसते. हे स्टेटमेंट पाहीले असता ०१.०७.२०२४ ते ०७.१२.२०२४ या कालावधीत आरोपी क्र.१ हर्षकुमार याच्या नावे मोठ्या प्रमाणात बँकेच्या नोंदी खातेउता–यावरील व्यवहाराप्रमाणे

झालेल्या दिसुन आले. हे सर्व व्यवहार नेट बँकींग प्रणालीद्वारे झालेले होते. इंडीयन बँकेचे मॅनेजर सुशील कुमार सेनी यांनी आम्ही चौकशी केले असता नेट बँकींग प्रणालीद्वारा व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. बँकेकडे चौकशी केली असता असे निदर्शनास आले की आरोपी क्र.१ याने dydsportsabad@gmail.com या मेल आयडी वरुन एक बँकेला मेल दि. १५.०२.२०२४ रोजी पाठवीला. या मेल मध्ये एक अटॅचमेंट कागद पाठविला होता ज्यामध्ये बँकेचा विहीत नमुना ज्यामध्ये हर्षकुमारचा मो.नं. ८०८०४९६६६२ हा अपडेट करण्यासाठी व नेटबँकींग सुरु करण्याचा होता. या वीहीत नमुन्यात आमच्या सचिवांची सही नव्हती पन विभागीय क्रिडा संकुलाचा शिक्का होता. त्यामुळे बँकेने मेल प्रमाणे काही कार्यवाही केली नाही. हा ई मेल व त्यासोबतचा अटॅचमेंट मी ओळखेल. हा ईमेल व अटॅचमेंट मला दाखविली. ती हीच आहे. त्यावर विभागीय क्रिडा समीतीचा शिक्का आहे. व आरोपी क्र. १ चा मोबाईल नंबर नमुद आहे.

**१५.** त्यानंतर आरोपी क्र.१ हर्षकुमार याने दि. १६.०५.२०२४ रोजी dydsportsabad@gmail.com या ईमेल वरुन पुन्हा पाठवला. यामध्ये एक अटॅचमेंट होती. त्या अटॅचमेंटला एक पत्र जोडले होते हे पत्र आरोपी क्र.१ ने तयार केले. हे पत्र शाखा प्रबंधक, इंडीयन बँक यांना लिहीलेले जा.क्र. वि.क्री.सं.स./क्रि.सु.वा./२०२३-२०२४/३५८ दि.१४.०५.२०२४ असे होते. या पत्रामध्ये आरोपी क्र.१ ने स्वतःचा मो.क्र. ८०८०४९६६६२ हा बँकेच्या खाते क्र. ५००८५४९५७०७ ला सलग्न करने आणी नेट बँकींगच्या सर्व सुविधा देण्याच्या संदर्भाने होते. मला हा ई मेल आयडी आणि त्यासोबतचे अटॅचमेंट दाखवले. बँकेने या १६.०५.२०२४ च्या ई मेल वर सुद्ध कार्यवाही केली नाही. त्यानंतर पुन्हा हाच ई मेल ३०.०५.२०२४ रोजी पुन्हा dsccch.sambhajinagar@gmail.com या ई-मेल वरुन पाठविला. दि. ३०.०५.२०२४ चा ईमेल मला पुन्हा दाखवला तो हाच आहे. या ई मेल वरुन बँकेने आरोपी क्र.१ हर्षकुमार यास नेटबँकींग सुविधा दिल्याचे दिसुन आले. त्यानंतर बँकेचे खाते पाहील्यावर असे लक्षात आले की आरोपी हर्षकुमार याने विभागीय क्रिडा संकुल समीतीच्या इंडीयन बँकेच्या खात्यातील रक्कम २१५९३८२८७/- रुपये स्वतः च्या व ईतर खात्यात वळते केल्याचे दिसुन आले. ही रक्कम आरोपी क्र.१ याने नेटबँकींग सुविधेचा वापर करुन वळते केले. आरोपी क्र.१ याने नेटबँकींग प्रणालीची सुविधा विभागीय क्रिडा संकुल

समीती च्या नावे बनावट व खोटे पत्र तयार करुन ते पत्र बँकेला बनावट ई मेल आयडीवरुन पाठविले आणी स्वतःचा मो.क्र. त्या बँक खात्याला अटॅच करुन नेट बँकींगची सुविधा मिळविली. आरोपी क्र.१ व आरोपी क्र.२ यशोदा या दोघांनी मिळुन हे पत्र तयार केले असा आमचा समज आहे.

**१६**. आरोपी क्र.१ व २ यांनी जानीवपुर्वक विभागीय क्रिडा संकुल समीतीची फसवणुक करण्याच्या उद्देशाने हे बनावट प्रमाणपत्र तयार केले व बनावट ई–मेल वर ते बँकेला पाठवुन इंटरनेट बँकिंग प्रणाली मिळविली. बँकेकडे चौकशी केली असता आरोपी क्र.२ हीच्या खात्यावर आरोपी क्र.१ याच्या बँक खात्यातुन रक्कम २५००००/– रुपये वळते केल्याचे दिसुन आले व आ.क्र.२ चे पती व्ही.के.जीवन यांच्या युनीयन बँकेच्या खात्यावर १,६९,५०,०००/– रुपये वळते केल्याचे दिसुन आले. तसेच ईतरही अनेक खात्यावर रकमा वळते केल्याचे दिसुन आले.

**१७**. या सर्व प्रकारावरुन असे लक्षात आले की आरोपी क्र. १ याने बनावट ई–मेल आयडी dsccch.sambhajinagar@gmail.com हा तयार केला आणी आरोपी क्र. १ व २ यांनी या बनावट ई मेल आयडीवर बँकेचे स्टेटमेंट घेतले, त्यामध्ये अपहाराच्या रकमा एडीट करुन काढुन टाकले. बनावट स्टेटमेंट लेखा परीक्षणासाठी हजर केले व लेखा परीक्षण समीती व विभागीय क्रिडा संकुल समीतीची फसवनुक केली. आरोपींनी बनावट पत्र श्री. संजय सबनीस यांचे नाव व सही वापरुन बँकेला पाठविले. व त्याचा गैरवापर केला. हा गैरवापर कार्यालयाचा जुन्या पत्रव्यवहार याच्याशी छेडछाड करुन केला. जुन्या पत्रातील संजय सबनीस यांची सही आणि त्यांचे पद असलेला मजकुर बनावट पत्रामध्ये वापरला. हे बनावट पत्र बँकेला पाठवुन नेट बँकींग प्रणाली मिळवुन खात्याला स्वतःचा मो.क्र. अटॅच केला. हे बनावट पत्र dsccch.sambhajinagar@gmail.com या बनावट ई मेल वरुन पाठविले. आरोपी क्र.१ ने नेटबँकींग प्रणालीचा वापर करुन व स्वतःच्या मो.क्र. चा वापर करुन विभागीय क्रिडा संकुल समीतीच्या नावे असलेल्या खात्यावरुन रुपये २१५९३८२८७/– जुन २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान वळते करुन आरोपी १ ने स्वतःच्या आर्थीक फायद्यासाठी स्वतःच्या खात्यावर वळते करुन घेतले व ईतरांच्या खात्यावर वळते करुन घेतले. आरोपींनी असे कृत्य करुन शासकीय रकमेचा गैरव्यवहार करुन शासनाची फसवनुक केली.

**१८.** मी पोलीसांना जवाहरनगर पो.ठाणे औरंगाबाद येथे २१.१२.२०२४ रोजी फिर्याद दिली. मला ही फिर्याद दाखवली. ती हीच आहे. यावर माझी सही आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. दि.१३.१२.२०२४ रोजी स्टेटमेंट पाहील्यावर प्रथम आरोपी क्र.१ चे कृत्य लक्षात संध्याकाळी आले. दुस–या दिवशी दिनांक १४.१२.२०२४ रोजी बँकेकडे स्टेटमेंट प्रमाणे चौकशी केली. रकमांची माहीती घेतली संदीग्ध व्यवहाराची कल्पना आली मग रकमा खुप मोठ्या होत्या. आमचे सचीव श्री. संजय सबनीस यांनी जवाहर नगर पोलीस ठाणेला पत्र दिले की या झालेल्या प्रकरणात चौकशी करावी. रक्कम मोठी असल्यामुळे त्यांनी आर्थीक गुन्हे शाखेकडे जायला सांगीतले. त्यानंतर आर्थीक गुन्हे शाखेने खाते गोठवुन प्राथमीक चौकशी केली. त्यानंतर श्री. संजय सबनीस यांनी विभागीय क्रिडा संकुल समीतीचे अध्यक्ष व सर्व सदस्य यांच्याशी चर्चा केली व त्यांच्या कानावर हे सर्व प्रकरण घातले. त्यानंतर दि. २०.१२.२०२४ रोजी पत्र देउन मला फिर्याद देण्यासाठी संजय सबनीस यांनी प्राधीकृत केले. त्यानंतर मी दि. २१.१२.२०२४ रोजी फिर्याद दिली. या फिर्यादीला **निशाणी क्रमांक ६६** देण्यात आला त्यासोबत पोलीसांनी नमुद फॉर्म मध्ये सुद्धा प्रथम खबर नोंदवुन घेतली. ती मला दाखविली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. या नमुद फॉर्म मधील प्रथम खबरीला नि.क्र.६७ देण्यात आले. मला दिलेले पत्र मुळ स्वरुपात मी आज रोजी आनलेले आहे ते मी आज हजर करतो. ते पत्र मला दाखवले ते हेच आहे यातील मजकुर बरोबर आहे यावर संजय सबनीस यांची सही आहे. पत्र मीळाले म्हणुन माझी सही आहे. या पत्राला **निशाणी क्रमांक ७०** देण्यात आले.

**१९.** दि. २२.१२.२०२४ रोजी आमच्या कार्यालयात पोलीस आले. त्यांनी आमच्या कार्यालयातील कॅशबुक, जावक रजीस्टर आणि आरोपी क्र. १ व २ ज्या संगणकावर काम करत त्याचा सी.पी.यु. जप्त केला. हा सीपीयु काळ्या रंगाचा व फ्रंटेक सायबर असे लिहीलेला होता. पोलीसांनी हे जप्ती करताना पंचनामा केला. हा पंचनामा मला दाखवला या पंचनाम्यावरुन माझी सही व अंगठा माल ज्याच्या ताब्यातुन जप्त केला या कॉलमवर आहे. या पंचनाम्यावर पोलीस आणि साक्षीदारांची सही आहे. मी कॅशबुक, जावक रजिस्टर व सी.पी.यु. पाहील्यास ओळखेल. पंचनाम्यावरील माझ्या सही आणि अंगठ्याला **निशाणी क्रमांक ७१** देण्यात आले. मला मुद्देमाल

जावक वही दाखवली. हे जावक रजीस्टर आमच्याच कार्यालयाचे आहे ते मी ओळखतो. या जावक रजीस्टरला **निशाणी क्रमांक ७२** देण्यात आले. आरोपीने बनावट तयार केलेले पत्र व त्याला दिलेला जावक क्रमांक ३५८ हे तपासण्याकरीता जप्त केले. या जावक रजिस्टरमधील ३५८ ला असलेली नोंद श्री. झांजरी नावाच्या व्यक्तीला ना–हरकत देण्यासाठी दिलेल्या पत्राची नोंद आहे ना की आरोपी क्र.१ ने बँकेला पाठविलेल्या पत्राची नोंद आहे. मला ही ३५८ क्रमांकाची नोंद दाखविली. ही नोंद झांजरी या व्यक्तीसाठी करण्यात आलेली आहे. या नोंदीला **निशाणी क्रमांक ७३** देण्यात आले. हा पंचनामा आमच्या कार्यालयात साधारन दुपारी ०१:४५ ते ०३:०० वाजेपर्यंत चालले. जप्ती पंचनाम्यानंतर आमच्या कार्यालयातील अजुन काही कागद आवश्यक होते त्याप्रमाणे पोलीसांनी आमच्या कार्यालयात उपसंचालकाच्या नावे पत्र दिले. हे पत्र मला दाखवले ते हेच आहे. या पत्रावर मिळाले म्हणुन माझी सही आहे. या पत्राला **निशाणी क्रमांक ७४** देण्यात येते. आम्ही हे पत्र मिळाल्यावर दि.२४.१२.२०२४ रोजी पत्रासोबत आवश्यक कागदपत्रे जोडुन पोलीसांना दिले. हे पत्र मला दाखवले या पत्रावर माझी सही आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पत्रावर पोलीसांच्या संबंधीतांची सही शिक्का आहे. या पत्राला **निशाणी क्रमांक ७५** देण्यात आले. या पत्रासोबत माझा नियुक्ती आदेश दिला. या आदेशावर माझी क्र.१२ वर नियुक्ती झाल्याचे नमुद आहे. या आदेशाला **निशाणी क्रमांक ७६** देण्यात आले. त्याप्रमाणे स्वप्नील तांगडे यांचा नियुक्ती आदेश पोलीसांना दिला. या आदेशाला **निशाणी क्रमांक ७७** देण्यात आले. तसेच मी आमच्या कार्यालयातील नियुक्ती आदेश या पत्रान्वये देण्यात आले. पोलीसांना या पत्राने कर्मचार्यांचे कार्यभार विवरन व कार्यभार हस्तांतर यादी, दिशा फॅसीलीटी यांची वर्क ऑर्डर, टेंडर डॉक्युमेंट, वेव्ह मल्टी सर्वीसेस यांची वर्क ऑर्डर व टेंडर डॉक्युमेंट पोलीसांना दिले. मला व्हेव मल्टी सर्वीसेस ची वर्क ऑर्डर व त्यांना काय मनुष्यबळ पाहीजे याची यादी दाखवीली. ती हीच आहे यातील मजकुर खरा व बरोबर असुन यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व शिक्क्यावर माझी सही आहे. यास **निशाणी क्रमांक ७८ व निशाणी क्रमांक ७९** देण्यात आले. पोलीसांना वेव्ह मल्टी सर्वीसेसेला आमच्या कार्यालया मार्फत रक्कम अदा करण्यासाठी केलेल्या टिपण्या तसेच त्या टिपण्यांवर झालेले आदेश व त्यांच्या मार्फत पुरवण्यात आलेले मनुष्यबळ याचा हजेरीपट हजर केलेल्या आहेत. या टीपण्या व हजेरीपट मला दाखवले ते हेच आहेत. यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. या

टिपण्यांना अनुक्रमे **निशाणी क्रमांक ८०, ८१, ८२, ८३ व ८४** देण्यात येत आहे. तसेच हजेरी पटाला एकत्रित **निशाणी क्रमांक ८५** देण्यात येत आहे. मी लेखा परिक्षण अहवाल पोलीसांना दिला. सदर लेखा परिक्षण अहवाल हा मला दाखवला. सदर अहवाल दोषारोप पत्र पान क्र.१९६ ते २०९ असुन याला एकत्रित **निशाणी क्रमांक ८६** देण्यात येत आहे. लेखा परिक्षणाच्या वेळेला आरोपीने लेखा परिक्षण समितीला दिलेले बँकेचे स्टेटमेंट हजर केले. ते स्टेटमेंट दोषारोप पत्र पान क्र.२११ ते २५८ असुन यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का असुन शिक्कयावर मी सही केलेली आहे. या स्टेटमेंट पान क्र.२११ ते २५८ ला एकत्रित **निशाणी क्रमांक ८७** देण्यात येत आहे. ॲस्ट्रोटर्फ व सिंन्थेटिक ट्रॅकसाठी आलेला निधी याचा आदेश दि.२९.०३.२०१९ रोजीचा मी पोलीसांना दिला. सदर आदेशाप्रमाणे रक्कम रुपये ७,०७,९९,६००/– एवढा निधी आमच्या समितीला मिळाला आहे. सदर आदेश मला दाखवला, तो तोच आहे. सदर आदेशाला **निशाणी क्र.८८** देण्यात येत आहे. तसेच आमच्याकडे रक्कम रुपये ४५,००,०००/– नाविन्यपुर्ण योजनेसाठी आली होती. याचा आदेश जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्यामार्फत मिळाला. सदर आदेशाप्रमाणे रक्कम रुपये ४५,००,०००/– आमच्या समितीला मिळाले. सदर आदेशाला **निशाणी क्र. ८९** देण्यात येत आहे. शासनाकडुन दिनांक ०८.०३.२०२३ रोजी बांधकामा करिता रक्कम रुपये २,९८,८०,०००/– एवढा निधी मिळाला होता. त्याचा आदेश मी हजर केला होता. या आदेशाला **निशाणी क्र.९०** देण्यात येत आहे. शासनाकडुन दिनांक ३१.०३.२०२३ रोजी बांधकामा करिता रक्कम रुपये ११,२९,००,०००/– एवढा निधी मिळाला होता. त्याचा आदेश मी हजर केला होता. या आदेशाला **निशाणी क्र.९१** देण्यात येत आहे. याप्रमाणे पोलीसांच्या पत्रानुसार कागदपत्रे त्यांना देण्यात आली. सदर गुन्हयातील आरोपी हर्षकुमार क्षिरसागर, यशोदा शेट्टी, स्वप्नील तांगडे, नागेश डोंगरे यांना मी ओळखतो.

२०. आरोपी हे व्ही.सी. व्दारे खटल्याकामी हजर आहेत. प्रथम महिला आरोपी यांना दाखवले. साक्षीदाराने समोर बसलेले आरोपी ह्या यशोदा शेट्टी असल्याचे सांगितले. ईतर दोन महिला आरोपींना साक्षीदाराने ओळखत नाही असे सांगितले आहे. पुरुष आरोपी दाखवले असता, समोर बसलेले आरोपी हे स्वप्नील तांगडे हे लाल व निळसर रंगाचा टि शर्ट घातलेले आहेत. आता समोर बसलेला आरोपी दाखवला असता, तो नागेश डोंगरे याने हिरवा टि–शर्ट

घातलेला आहे. आता समोर बसलेला आरोपी दाखवला असता, तो हर्षकुमार क्षिरसागर आहे व त्याने निळा टि–शर्ट घातलेला आहे व त्याला मी ओळखतो. ईतर पुरुष आरोपींना मी ओळखत नाही.

**सरतपास– संपला**.

**(न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– ०५/०६/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद